# Summary

**Title of research project (History): "Maharashtratil Bramhnetar Chalval..."**
**UGC Ref: F.23-590/12(WRO).**


**सारांश :**

महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर चळवळीचा अभ्यास करताना या लघुशोध प्रकल्पाची मांडणी एकूण पाच प्रकरणामध्ये केलेली आहे. पहिल्या प्रकरणात - प्रस्तावना एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहासाची मांडणी केलेली आहे. एकूण प्रकरणांच्या अभ्यासंती काढलेले निष्कर्ष मांडलेले आहेत.

- महाराष्ट्रात या काळात जे समाजसुधारक होऊन गेले. त्यांनी स्थान केलेल्या समाजाची त्यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतला आहे. ब्राह्मणेत्तर चळवळीचा उदय, विकास, यात ब्राह्मणेत्तर चळवळीचा वस्तुस्थिती निदर्शक अभ्यास केला. तिची एक सामाजिक, धार्मिक सुधारणा संघर्षा, अशा स्वरूपातील सत्यशोधक समाज या संघटनेच्या प्रस्थापनेपर्यंत आणि नंतर तिचे वाढते जहालपण आणि आर्थिक प्रश्नावरील उठाव. परिक्षणाच्या दृष्टिने विचार करता ब्राह्मणेत्तर चळवळ एक सांस्कृतिक उठावाची चळवळ असा विचार केला आहे.
- समाजप्रबोधनाचे, समाजपरिवर्तनाचे व समाज जागृतीचे महान कार्य करणाया समाजसुधारकांनी केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला जे विचार दिले आहेत. भारतातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील थोर विचारवंतांनी आपले राजकीय व सामाजिक कार्य पार पाडताना महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या समाजप्रबोधनाच्या, समाजजागृतीच्या कार्यास दिलेले योगदानाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.
- सामाजिक रूढी, परंपरा यांनी बंदिस्त झालेल्या समाजाला सामाजिक समतेचा नवा साक्षात्कार या युगात आला.

- ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर चळवळ म. फुले यांच्या पासुन सुरु झालेल्या सत्यशोधक - ब्राह्मणेत्तर चळवळीच्या प्रवाहाची चर्चा करण्याचा प्रयत्न करून या प्रवाहाचे वेगळेपण स्पष्ट केले आहे.
- महाराष्ट्राच्या महत्त्वाच्या ऐतिहासिक परंपराची वाढ ब्राह्मणेत्तर आव्हानांच्या पार्श्वभूमीवर झाली.
- राजर्षी शाहू व अस्पृश्योद्धार - अस्पृश्योद्धासाठी कशी पावले उचलली याचे विवेचन करण्यात आले आहे.
- ब्राह्मणेतर चळवळीतील वृत्तपत्रांना व ब्राह्मणेत्तर लोकांना अर्थसाहाय्य केले. याचाही अभ्यास यात केला आहे.
- राजर्षी शाहू हे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. हिंदू-मुस्लिम यांच्यात सलोखा वाढावा म्हणून सतत प्रयत्नशिल होते.
- ब्राह्मणांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, गुलामगिरीतून ब्राह्मणेतरांची सुटका करणे.
- ब्राह्मणेत्तर लोकात स्वाभिमान व बंधु प्रेमाची जाणीव निर्माण करणे. ब्राह्मणेत्तरांची सर्वांगीण प्रगती घडवून आणणे त्यांना सरकारी नोक-यात हक्क मिळवून देणे. ब्राह्मणेत्तरांच्या अडचणी दूर करणे त्यांना प्रातिधिक संस्थामध्ये योग्यते प्रतिनिधित्व मिळवून देणे.
- ब्रिटीश राजवटीत मुंबई व चेन्नई प्रांतात ब्राह्मणेत्तर जातीनी एकत्र येऊन महाराष्ट्र जातीचा धार्मिक, शैक्षणिक, प्रशासकीय, राजकीय व आर्थिक वर्चस्वाविरूद्ध जो लढा पुकारला त्यास ब्राह्मणेत्तर चळवळ म्हणतात. महाराष्ट्र प्रांतातील ब्राह्मणेत्तर चळवळीचा सविस्तर अभ्यास, विश्लेषण केले आहे.

**Principal Investigator**
**Smt. V. N . Bagul**